Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

# मराठीतील वैचारिक वाङ्.मयाचे स्वरुप, परंपरा व भूमिका

**शरद भाऊसाहेब दुधाट,**

रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर,जि. अहमदनगर,

## १. प्रास्ताविक :

माणूस हा पृथ्वीवरील इतर प्राण्यांपेक्षा बुध्दिमान प्राणी आहे. इतर प्राण्यांपेक्षा त्याने आपल्या बुध्दिच्या जोरावर सर्वांगीण प्रगतीची गुरूकिल्ली मिळविली आहे. माणूस हा विचारशील असल्याने त्याने निसर्गाला आपल्यासाठी उपयोगात आणलेले आहे. त्यामुळे विज्ञानाचे अनेक शोध लागलेले आहेत. विज्ञान, अध्यात्म यामध्ये मानवी विचारधारा सदैव प्रभावीत आहे. विचारातूनच विकास होतो. समाजपोषक वातावरण निर्माण होते. महाराष्ट्रात महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज इत्यादींनी सामाजिक कल्याणाच्या भूमिकेतून पुरोगामी विचाराला महत्त्व दिले आहे.

## २. वैचारिक वाङ्.मय - व्याख्या व संकल्पना

‘‘ज्या साहित्यामध्ये विचारधनाची सुसंगत मांडणी केली जाते, त्या साहित्याला वैचारिक वाङ्.मय असे म्हणतात.’’[०१] द. के. गंधारे यांची ही व्याख्या महत्त्वपूर्ण आहे. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. माणसाला विचार करण्याची निसर्गदत्त देणगी आहे. मनुष्य स्वाभाविकपणे विचार करीत असतो. तर्कशास्त्रामुळे माणसाचे नैसर्गिक सामर्थ्य संस्कारित होत असते. त्यामध्ये अचूकता, गतिमानता आणि तर्कशुध्दपणा असतो. विज्ञान ही माणसाच्या बुध्दिची सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती मानली जाते. मानवाच्या कृतीमध्ये कमी अधिक विकारांना वाव असतो. विज्ञानसुध्दा भाषेतच निर्माण होते. विज्ञानाला वैचारिक साहित्य म्हणता येत नाही, परंतु वास्तव आणि सत्य हे विज्ञानाचे प्रयोजन आहे. विज्ञानातील भाषेचे कार्य यथार्थ चित्रण करणे हेच आहे. वैज्ञानिक भाषेमध्ये एकप्रकारची तार्किकता असते तर इतर क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या भाषेत युक्तिवाद असतो.

## ३.मराठी वाड्.मयाची वैचारिक पार्श्वभूमी

मराठी वाड्.मय अनेक दृष्टीने समृध्द आहे. सातव्या शतकापासून मराठीची उत्पत्ती दिसते. बाराव्या शतकात ग्रंथनिर्मिती झाली. तेव्हापासून मराठी वाड्.मयातील विविध वाड्.मयप्रकार, प्रवाह गतिशील झाले. मध्ययुगीन वाड्.मय हे संत-पंत-तंत स्वरूपाचे होते. तर अर्वाचीन वाड्.मय हे वैचारिक समृध्दीतून विकसित झाले. या वैचारिक वाड्.मयाचे प्रबोधन व बुध्दिवादाला महत्त्व दिले. या वाड्.मयाची पार्श्वभूमी पुढील मुद्यातून पाहता येईल

### ३.१प्राचीन कालखंड वैचारिक वाड्.मय

भारतातील हा आध्यात्मिक विचार प्राचीन काळी जगात अग्रेसर होता. त्यामुळेच भारतात मोठ्या आध्यात्मिक विचारांचे वाड्.मय निर्माण होते. वेद, उपनिषदे, पुराणे आणि अन्य धर्मग्रंथ हे संस्कृत भाषेत होते. त्यामुळेच मराठी भाषेतील वाड्.मय हे प्राचीन कालखंडात लिहिले गेले नाही. मराठी ही सर्वसामान्य माणसांची भाषा होती. या भाषेला महत्त्व देणारे महानुभावीय श्री चक्रधरस्वामी व त्यांचा संप्रदाय, श्री ज्ञानेश्वर व वारकरी संप्रदाय तसेच इतर संतमाहात्म्ये, संप्रदायांनी ‘माय मराठीला’ प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सातव्या शतकात मराठी भाषेतील काही शब्द आढळतात. दहाव्या शतकात मराठी वाक्य आढळते. अकराव्या शतकात काही ग्रंथात मराठीत रागतालाची माहिति मिळते. तर बाराव्या शतकात म्हणजे इ.स. ११८८ मध्ये मुकुंदराजांचा ‘विवेकसिंधू’ ग्रंथ आढळतो. तेराव्या शतकात म्हणजे इ. स. १२७८ मध्ये ‘लीळाचरित्र’, इ.स. १२९० मध्ये ‘ज्ञानेश्वरी’ हे ग्रंथ आढळतात. या तऱ्हेने मराठी भाषेतील ग्रंथ निर्मिती मध्ययुगात प्रारंभ झाला. प्राचीन, मध्ययुगीन वाड्.मय हे प्रामुख्याने पद्य स्वरूपातले होते. महानुभावियांचे काही ग्रंथ गद्य स्वरूपात होते. परंतु इंग्रजी राज्याच्या व मुद्रणकलेच्या शोधामुळे गद्य वाड्.मयाला गती प्राप्त झाली. संत-पंत-तंत वाड्.मयाने, महानुभाव, वारकरी व इतर संप्रदायांनी भक्तीबरोबर समाजप्रबोधनालाही महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे विविध विचारधारा द्वैत, अद्वैत ही मध्ययुगातही होती. त्या विचारधारेला आधुनिकतेचा प्रारंभ इंग्रजी राजवटीनंतर प्राप्त झाली.

### ३.२ अर्वाचीन कालखंडातील वैचारिक वाड्.मय

१३ ते १८ व्या शतकापर्यंत संत-पंत-तंत वाड्.मय निर्माण झाले. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट होऊन इंग्रजी राज्य प्रस्थापित झाले. १८०० ते १८७४ पर्यंत मराठी वाड्.मय हे प्रामुख्याने अद्भूतरम्य व प्राथमिक स्वरूपाचे होते. १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ‘निबंधमाला’ हे नियतकालिक सुरू केले. वैचारिक लेखनाला निबंधमालेने प्रारंभ झाला. या काळात स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांना महत्त्व देऊन अनेक वैचारिक निबंध लिहिले गेले. त्यानंतर लोकमान्य टिळकांनी ‘केसरी’ व ‘मराठा’ या वृत्तपत्रातून इंग्रजी जुलमी सत्तेविरूध्द जहाल वैचारिक निबंध लिहिले. याच काळात लोकमान्य टिळकांची ‘राजकीय सुधारणा’ तर गोपाळ गणेश आगरकरांची ‘सामाजिक सुधारणा’ या भूमिका वेगळ्या ठरल्या. आगरकरांनी ‘सुधारक’ वर्तमानपत्रातून सामाजिक सुधारणेचे विचार मांडले. महात्मा फुल्यांनी समाजसुधारणेला महत्त्व दिले.
दि. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचा अंत झाल्यानंतर भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा उदय झाला. भारतीय, मराठी राजकारण ‘जहालवादा’कडून ‘मवाळवादा’कडे सरकले. महात्मा गांधी ‘हरिजन’मधून सामाजिक एकतेला महत्त्व दिले. गरीब दीनदलितांचा त्यांनी कैवार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘मूकनायक’सारख्या नियतकालिकातून दलित समाजाला जागृत केले. जातीभेदाला विरोध केला. इ.स. १९५६ साली त्यांनी ‘धर्मांतर’ घडवून आणले. हिंदू धर्म सोडून आंबेडकरांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला. आंबेडकरांची विचारधारा ही मानवी प्रतिष्ठेला महत्त्व देणारी ठरली. महाराष्ट्रात वैचारिक चळवळीचा परिणाम झाला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दि. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी ‘रयत शिक्षण संस्थेची’ स्थापना केली. शिक्षणाची वैचारिक चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्याचे कार्य भाऊरावांनी केले. इ.स. १९२० ते १९४७ या काळातील महात्मा गांधीजींचा वैचारिक प्रभाव, इ. स. १९४७ ते १९६० पर्यंतची महाराष्ट्राची स्थिती, इ.स.

१९८० ते १९९० मधील स्थित्यंतरे, इ.स. १९९० नंतरचे जागतिकीकरण, इ.स. २००० ते २०१३ या कालखंडातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतरे यांचे संदर्भ दिसतात.

## ३.३वैचारिक लेखनाचे काही संदर्भ

मराठी वैचारिक वाड्.मयातून राष्ट्रीय मूल्यांची जोपासना होताना जाणवते. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदरपासूनच समाजसुधारक, विचारवंतांनी विपूल लेखन केलेले आहे. इंग्रजांच्या विरोधात निर्माण होणारी बुलेटीन, दैनिके, साप्ताहिके, मासिके, नियतकालिके, पुस्तके आदिंची निर्मिती ही मराठी वैचारिक वाड्.मयाचा दस्तऐवज आहे. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातून साहित्याचे लेखन होऊ लागलेले दिसते. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, गं. बा. सरदार, आचार्य शं. द. जावडेकर, नरहर कुरूंदकर आदी लेखकांनी मराठीमध्ये वैचारिक लेखन केलेले आहे. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची दारे उघडी करून शिक्षणाच्या समतेचा विचार पुढे आणला. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मुक्तीचा लढा पुकारला. स्त्रियांचे स्थान आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी स्त्रियांनी मुक्तीची चळवळ उभारली. यामध्ये ताराबाई शिंदे, गो. ग. आगरकर आदी स्त्रियांनी पुढाकार घेऊन स्त्रियांवरील अत्याचार, अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा गांधींनी हिंदू-मुस्लिम यांच्या ऐक्याच्या प्रश्नावर विचार मांडलेले आहे. महात्मा फुलेंनी १९ व्या शतकात पाण्याच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांसाठी 'शेततळ्याची कल्पना' प्रथमच मांडली. या शिवाय त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकातून शेती आणि शेतकऱ्यांच्या हलाखीचे व सुधारणेचे चिंतन मांडलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रही, अस्पृश्याच्या न्याय हक्कासाठीचे विचार, लोकहितवादींचे हिंदू धर्म आणि चालीरिती, परंपरा याविषयाचे विचार, न्या. महादेव रानडे यांचे तर्कशुध्द विचार तसेच मे. पु. रेगे यांचे नीतीचा आशय आणि स्वत: साध्य माणूस याविषयी मांडलेले विचार, याशिवाय मुकुंद पाटील यांनी हिंदूंच्या नादानपणाचे मूळ कशात आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजामध्ये प्रबोधन आणि सामाजिक ऐक्य निर्माण करण्याप्रती विचार व्यक्त केलेले आहेत. तसेच शेतकरी नेते शरद जोशी यांनी 'शेतकरी चळवळ' आणि 'जातीय दंग्यांचे रसायनशास्त्र' या विषयावर मांडलेले विचार, हे सर्व विचार मराठी वैचारिक क्रांतीला पाठबळ देणारे आहे.

## ३.४ वैचारिक लेखकाचे योगदान

इंग्रज राजवट स्थिर झाल्यानंतर वैचारिक वाड्.मय लेखनाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली ती मुद्रणकलेमुळे. आधुनिक मुद्रणकलेच्या क्रांतिविषयी डॉ. सुधाकर शेलार म्हणतात, ''मुद्रणकलेमुळे उदयास आलेली नियतकालिकांनी वैचारिक क्रांतीला प्रसृत लेखन केले. या वैचारिक साहित्याने मराठी विषयाच्या मन्वंतरामध्ये मोठा वाटा उचलेला आहे.''[०२] स्वातंत्र्योत्तर काळामध्ये नियतकालिकामधून लेखन अभावाने झालेले आहे. तरीही वैचारिक साहित्याचे लेखक चिंतनशील अभ्यासातून समाजाची जागृती करण्याचे प्रयत्न करीत आहेत. प्रा. डॉ. द. के. गंधारे म्हणतात, ''स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, मुकुंद पाटील, हमीद दलवाई, शरद जोशी यांनी आपल्या कार्यातून व वैचारिक लेखनातून बंधुत्वाचा संदेश दिला. अनिष्ठ प्रवृत्तींच्या भोवऱ्यात गुरफटलेल्या समाजाला त्यांनी उध्दाराचा मार्ग दाखविला.''[३] याशिवाय अनेक साहित्यिकांनी धर्म, समाज, संस्कृती, साहित्य याविषयी आपले चिंतन व्यक्त केलेले आहे. विठ्ठल रामजी शिंदे, न्या. रानडे, लोकहितवादी, मे. पु. रेगे यांनी वैचारिक साहित्यातून नीतीविषयक विचार मांडलेले आहेत. तर विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाबा पद्मनजी, लोकहितवादी, महात्मा फुले, गो. ग. आगरकर, वि. दा. सावरकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी वैचारिक साहित्यातून सामाजिक विचार मांडलेले आहेत. आजच्या काळामध्ये विश्वनाथ खैरे, शेषराव मोरे, शरद पाटील, आ. ह. साळुंके, हरी नरके, सदानंद मोरे, स. रा. गाडगीळ, रावसाहेब कसबे, य. दि. फडके आदी लेखक वैचारिक समाजपरिवर्तनाला दिशा आणि गती देण्याचे प्रयत्न करीत आहेत. याशिवाय लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या वैचारिक वाड्.मयाला वेगळी दिशा दिलेली आहे. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैचारिक लेखनपरंपरेवर 'निबंधमाला'कार चिपळूणकर, 'गीतारहस्य'कार, 'सुधारका'चे संपादक आगरकर व

इतिहास संशोधक वि. का. राजवाडे यांचा प्रभाव जाणवतो. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या 'आनंदमीमांसा' या पहिल्या वैचारिकनिबंधातूनसामाजिकव तत्त्वज्ञानाचे वास्तवदर्शन घडविलेले आहे.

### ३.५ मानवी विचारशील संस्कृतीची वाटचाल

मराठी वैचारिक लेखन विविध विषयांनी नटलेले आहे. हयामध्ये नीती आणि सदाचाराविषयी विपूल लेखन झालेले आहे. मानवी जीवनाविषयी असलेल्या अपार करूणेतून हे लेखन अभिव्यक्त झालेले आहे. धर्माच्या नावावर होणारे शोषण, अनाचार ह्या विषयी परखड टीका जरी असली तरी त्यामध्ये तसे अध्यात्माच्या आधारे सदाचाराची शिकवणही दिली गेली आहे. या वैचारिक लेखनामध्ये मानव आणि मानवता हे विचारवंतांच्या चिंतनाचा विषय बनलेले आहे. मानवी जीवन आणि मानवी संस्कृती सुखकर आणि सुंदर करण्याचाच वैचारिक साहित्याचा विचार आहे. मानवी संस्कृतीनेच समाजाची धारणा होते. वैचारिक साहित्यामध्ये माणूस हा जीवनाचा आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. माणसाची संस्कृती विचारातून आकाराला आलेली आहे. विचार हे माणसाचे प्रमुख हत्यार ठरल्यामुळेच इतर प्राण्यांपेक्षा त्याची प्रगती झालेली आहे. माणसाने आपल्या बुध्दिच्या जोरावर अनेक दिशांनी प्रगती केलेली आहे. आध्यात्मिक विचारधारेनंतर त्यांची आधुनिक विचारधारा स्वातंत्र्यमूल्याला महत्त्व देणारी आहे.

### ३.६ मानवी विकासाची कार्यशाळा

**''विश्वी विश्वंभर। बोले वेदांताचे सार।।**
**जगी जगदीश। शास्त्रे वदती सावकाश।।**
**व्यापिले हे नारायणे। ऐसी गर्जती पुराणे।।**
**जनी जनार्दन। संत बोलती वचन।।**
**सूर्याचिया परी। तुका लोकी क्रीडा करी।।''**

कुरूक्षेत्रावर भावनाविवश झालेल्या अर्जुनाला कर्तव्याची जाणीव देण्यासाठी श्रीकृष्णाला गीता सांगावी लागली. संत ज्ञानेश्वरांना या गीतेचे तत्त्वज्ञान साध्या सोप्या मराठी भाषेतून लोकांना सांगावे लागले. ह्या विचारामागे

**''शहाणे करूनी सोडावे सकळजन''**

ही भावना होती. संत तुकडोजी महाराजांना 'ग्रामगीता' सांगावी लागली. संत गाडगे महाराजांनी रस्त्यावरच्या विद्यापीठातून लोकशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या सर्व प्रयोगशाळेत 'विचारदिशा' महत्त्वाची होती. भारतीय समाजाची चार आश्रमव्यवस्था, चार वर्णव्यवस्था, चार वेदांची शिकवण इत्यादींमधून समाजाची जडणघडण झाली. काळाच्या ओघात आदर्श मूल्यांना काळीमा फासण्याचे काम केले गेले. स्वार्थासाठी 'माणुसकीचे तत्त्वज्ञान' मागे पडले म्हणून संतमाहात्म्ये, समाजसेवक, विचारवंतांनी कृती व विचारांच्या प्रयोगशाळेतून समाज घडविण्याचे प्रयत्न केले. मूल्याधिष्ठित समाजासाठी वैचारिक वाड्.मय ही मानवी संस्कृतीची खरी गुरूकिल्ली आहे.


### ३.७विचारवंतांची वैचारिक विविधता

प्राचीन काळातील चाणक्यनीती, शंकराचार्याचे तत्त्वज्ञान इत्यादींमधून तर संत व संप्रदायाची वैचारिक विविधता दिसून येते. महानुभावियांची 'द्वैत' विचारधारा, वारकरी संप्रदायाची 'अद्वैत' विचारधारा मध्ययुगात चर्चेचा विषय ठरली. त्यातून महानुभाव व वारकरी वाड्.मय निर्माण झाले. आधुनिक काळात 'जहालवाद' व 'मवाळवाद' ह्या भूमिका चर्चेत ठरल्या. लोकमान्य टिळकांचा जहालवाद व महात्मा गांधीजींचा 'मवाळवाद' यातून साहित्य निर्मिती झाली. वि. स. खांडेकरांचा


'जीवनवाद' व प्रा. ना. सी. फडके यांचा 'कलावाद' यातून साहित्य निर्मिती झाली. आगरकरांची सामाजिक, महात्मा फुल्यांची कल्याणकारी पुरोगामी भूमिका यातून साहित्य निर्माण झाले. महाराष्ट्रात कम्युनिस्टांची विचारधारा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात होती. प्रतिगामीकृतीही साहित्य निर्मितीला दिशादर्शक ठरली.

## ४. विचार व विचारप्रक्रिया म्हणजे काय?

एखाद्या व्यक्तीने विशिष्ट आचरण व्यवस्थेसाठी बुध्दीनिष्ठ केलेला आविष्कार म्हणजे 'विचार' होय. ''विचार म्हणजे विवेकशील समाज प्रगती करतो. 'विवेक' म्हणजे सद्‌विचार. निर्णय घेणे, निवड करणे हे बुध्दिचे कार्यक्षेत्र आहे. सत्य-असत्य, बरं-वाईट, खरं-खोट, योग्य-अयोग्य याबाबतचा निर्णय करणारी सद्‌बुध्दि म्हणजे विवेक. बुध्दि हे विचार करण्याचे केवळ साधन (इंद्रिय) आहे.''[०४] प्रा. ह. श्री. शेणोलीकर यांची विवेक आणि आचार यांची व्याख्या तेवढीच महत्त्वाची आहे. विशिष्ट आचरणासाठी सांगितलेला जीवनसार महत्त्वाचा ठरतो. विचार ही बुध्दिची देणगी आहे. विचारप्रक्रिया अखंड चालणारी कार्यप्रणाली असते. माणूस त्यातील महत्त्वाचा घटक आहे. विचारप्रक्रिया, विचारनियम या संदर्भात मराठी विश्वकोशात स्वतंत्रपणे विवेचन केलेले आहे. विचारप्रक्रिया ही आपल्या सभोवती असलेल्या वस्तू, घटना, प्रसंगाचे अवलोकनातून प्रत्यक्ष ज्ञानावर आधारित असते. तसेच अप्रत्यक्षपणेही आपण मन:चक्षूने एखाद्या घटनेचे संदर्भ घेऊन अप्रत्यक्ष ज्ञानावर विचारप्रक्रिया होऊ शकते. म्हणजे वास्तव व काल्पनिक विचार असा फरक करता येतो. विचारप्रक्रियेत संकल्पनाही अंतर्भूत असतात.




मे. पु. रेगे म्हणतात, ''एखादा शोध नव्याने लावण्यामागे किंवा करण्यामागे सर्जनशील क्रिएटिव्ह विचारप्रक्रिया असते.''[०५] विचारप्रक्रियेत सर्जनशीलतेलाही महत्त्व असते. सर्जनशीलता ही नवनिर्मितीशील असते. ''सर्जन करणे म्हणजे जे पूर्वी करण्यात आले आहे त्याचे अनुकरण न करता काही तरी महत्त्वाचे किंवा अर्थपूर्ण असे निर्माण करणे म्हणजे विचारप्रक्रिया होय.''[०६]




## ४.१ वैचारिक साहित्य : प्रेरणा आणि प्रभाव

वैचारिक साहित्याची प्रेरणा ही आपल्या विचारसरणीचे स्पष्टीकरण व समर्थन करीत इतरांना पटवून देत त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्याला अनुकूल करून घेणे ही असते. माणूस हा विचारशील असल्यामुळे तसेच स्वत:ची मते स्वत: निर्माण करू शकत असल्यामुळे या गृहितांवरच वैचारिक साहित्याची निर्मिती शक्य होते. विज्ञानामध्ये सत्यशोधन जसे महत्त्वाचे आहे तसे वैचारिक साहित्यामध्ये स्वमत आणि परमत परिवर्तनालाही महत्त्व असते. केवळ तर्कावर आधारित न राहता

कधी कधी तर्कयुक्त क्लृप्त्याचाही आश्रय घ्यावा लागतो. वैचारिक साहित्य आणि ललित साहित्य यांच्यामधील फरक प्रकाराचा नसून प्रमाणाचा आहे. वि. स. खांडेकरांच्या साहित्यात समाजवादी मूल्यांचा पुरस्कार असला तरी त्यांची पात्रे वैचारिक वादविवाद करतात. थोडक्यात मूल्यांच्या अनुरोधाने इतरांचे मतपरिवर्तन करणे व तद्नुषंगित कृतीही करायला लावणे ही वैचारिक साहित्याची प्रेरणा आहे. पहिला मुद्दा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळविणे याच मूल्याचा विचार असल्याने या काळात वैचारिक साहित्य निर्माण झालेले दिसत नाही. दुसरा मुद्दा म्हणजे पुढील काळात स्वातंत्र्याचा आशय हा सामाजिक होता त्यामुळे जातिव्यवस्था, विषमता, अन्याय या पलिकडे जाऊन वैचारिक साहित्याची निर्मिती झालेली दिसत नाही. शेवटी तिसरा मुद्दा म्हणजे वैचारिक साहित्यावर सामाजिक व राजकीय प्रभाव जाणवतो. हा वैचारिक साहित्याचा काळ विवेकाचा होता. महात्मा गांधी यांचा देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे आणि मार्क्स यांचा श्रमिकांच्या सुखदु:खाशी एकरूप हाच वैचारिक साहित्यावरचा प्रभाव जाणवतो. वैचारिक साहित्याच्या विचारमंथनाने समाजाला गती मिळाली तसेच सामाजिक परिवर्तन व प्रबोधनालाही दिशा मिळाली.

## ४.२ सामाजिक जागृती - प्रबोधनाचे सूत्र

साहित्य हा जीवनाचा आरसा आहे. साहित्यात गद्य व पद्य तसेच ललित व ललिततेतर प्रकार पडतात. ललित वाड्.मय हे भावनाप्रधान असते. तर ललितेत्तर वाड्.मय हे बुध्दीप्रधान असते. मराठीत वैचारिक वाड्.मयाला एक समृध्द परंपरा व विचारधारा लाभलेली आहे.

साहित्यामध्ये विचारांना प्राधान्य असल्यामुळे प्रबोधनाचे काम वैचारिक साहित्यातून होत असते. वैचारिक साहित्य हे गद्यात अभिव्यक्त होत असते, त्यामुळे काव्यात्मक भाषेचा अधिक प्रमाणात वापर केला जात नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंध लेखनातून वैचारिक लेखनाची सामाजिक चळवळ निर्माण केलेली दिसते. तर महात्मा फुले आपल्या क्रांतिकारक विचारातून समाजाबद्दलची प्रखर जाणीव प्रदर्शित करताना दिसतात. वैचारिक साहित्याची निर्मिती ही स्वातंत्र्यपूर्व काळातील असल्यामुळे सामाजिक सुधारणांना प्राधान्य देण्याचे महत्वपूर्ण कार्य वैचारिक साहित्याने केलेले आहे. तेव्हापासून वैचारिक साहित्यातून सामाजिक, राजकीय, धार्मिक गोष्टींमध्ये वैचारिक बदल घडवून लोकांपर्यंत हे विचार पोहच करण्यावर अधिक भर दिलेला आहे. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाराज, लोकहितवादी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृष्णराव भालेकर आदी लेखकांनी वैचारिक वाड्.मयामध्ये लेखन समाजजागृतीचे कार्य केलेले आहे.

## ४.३ विचारशीलता - वैचारिक वाड्.मयाचा पाया

मनुष्य हा विचारशील आहे. त्यामुळे समाजात सदैव बदल घडत असतो. माणसाने आपल्या विचारातूनच अनेक क्रांत्या केल्या आहेत. माणूस विचारशील असल्यामुळे 'संस्कृती' निर्माण झाली. 'संस्कृती' म्हणजे 'माणसाची सुसंस्कृतीची अवस्था' होय. प्रकृती-संस्कृती-विकृती या महत्त्वाच्या त्रिसूत्रीतून अनेकांनी मते मांडली आहेत. मनुष्य नैसर्गिकरित्या जन्म घेतो. त्या प्रकृतीवर कुटुंब, गाव, शिक्षण, धर्म व इतर घटकांचे संस्कार लाभतात. त्यातून मनुष्याला सुसंस्कृत अवस्था प्राप्त होते. त्याच प्रमाणे मातीला कुंभार आकार देतो व त्यातून एक घडा निर्माण होतो. म्हणजे माणूस त्याच्यावर संस्कार करतो. माणूस ज्याची जडणघडण करतो ती संस्कृतीकलाच असते. या प्रकृतीत मात्र काही बिघाड झाला की त्याला विकृतीचा अर्थ प्राप्त होतो. अशी विकृती समाजघातक असते. अग्नी ह्या घटकांचा वापर करून आगगाडी अथवा इतर वाहने चालविणे हे उपयोग संस्कृतीशील आहेत. परंतु अग्नीने एखाद्याला पेटविणे अथवा नाहक जाळणे ही विकृती आहे. या तऱ्हेने मानवी संस्कृतीत प्रकृती-संस्कृती-विकृती या तीन घटकांचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. समाजात संस्कृतीचे पोषण होणे ही सकारात्मक विचारशीलता माणसाने जोपासल्यामुळे मानवी संस्कृती उदयाला आलेली आहे. माणूस हा विचारशील असल्यामुळेच त्याच्या लेखनातूनही ही विचारशीलता व्यक्त होत असते. वैचारिक साहित्याचा पाया हा असा विचारशीलतेतून तयार होत असतो.

## ४.४ मूल्यविचारांची दिशा

'मूल्य' हा शब्द अनेक अर्थाने वापरला जातो. सृष्टीची व विश्वाची मूळ रचनाच मूल्यात्मक आहे. एखाद्या वस्तूत आणि क्रियेमध्ये असणारा चांगला गुण म्हणजे 'मूल्य' असेही म्हणता येईल. किंमत, श्रेय, हित अथवा दाम या अर्थाचे पर्याय विनिमयाच्या व्यवहाराशी जुळणारे आहेत. वाचन, व्यासंग, मनन, चिंतन, एकाग्रता, आकलन, बुध्दी, तन्मयता, समरसता यातून वाङ्.यमीन मूल्य मिळविण्याचा वाचकाचा प्रयत्न असतो. याशिवाय वाचक हा समाजाचा एक घटक आहे. समाजामध्ये अनौपचारिक दृष्टीने तो काही घेत असतो आणि काही देतही असतो. समाजातून बौध्दिक, सांस्कृतिक, सामाजिक विचारातून तो ज्या गोष्टी घेतो व देतो, त्याचा विचार सामाजिक मूल्यांमध्ये केला जातो. त्यामुळे त्या व्यक्तींच्या दृष्टीने अगोदर सामाजिक मूल्ये आणि नंतर वाङ्.मयीन मूल्ये या संकल्पना महत्त्वाच्या आहेत. या शिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मानवतावाद आणि मूल्यविचाराबाबत म्हणतात, ''मानवी मूल्ये ही अंतिम मूल्ये होत, हे मानवतावादाचे प्रथम सूत्र आहे. मानव हा शिक्षणाने स्वत:ला बदलणारा आणि विकसित होणारा असा प्राणी आहे, अशा अनेक विचारांनी प्रेरित झालेले आंदोलन मानवतावादी होय.''[७] या मानवतावादी आणि मूल्यविचारांची चळवळ ही युरोपमध्ये प्रथम झाली. तशी मूल्ये ही परिवर्तनशील आहेत. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात ती आढळतात. याशिवाय विविध विचारसरणीतून ती आकाराला येत असतात. मूल्याची व्याख्या तज्ज्ञांनी दिलेली आहे. ''मूल्ये म्हणजे व्यवच्छेदक गुणांची, मूलभूत प्रकृतीची किंमत अथवा मान्यता, तत्त्व, सारांश, सिध्दांत, आदर्श किंवा निकष होय.''[८] प्रा. निशिकांत ठकार यांची मूल्यांची ही व्याख्या साहित्यमूल्य विचाराच्या दृष्टीने मोलाची आहे. लेखकाचा मूल्यविचार हा व्यक्तीसापेक्ष आणि देशसापेक्ष असतो. साहित्यामध्ये लेखकाला आपल्या अनुभवविश्वातून आणि नैतिकतेतून तसेच कृतीतून मूल्यविचार साकारण्याचे स्वातंत्र्य असते. मुळातच लेखकाचे विचारविश्व हे मूल्याधिष्ठीत असते, त्यामुळे लेखकाच्या विचारसरणीतून केवळ मूल्ये आणि मूल्ये साकारली जातात. वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता, संवेदनशीलता, सर्वधर्मसहिष्णुता, स्त्री-पुरूष समानता, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता ही मुख्य मूल्ये वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची मानली जातात. याशिवाय जीवनात इतर काही मूल्ये महत्त्वाची आहेत. मूल्यविचाराबाबत समीक्षक र. बा. मंचरकर म्हणतात, ''प्राकृतिकतेला प्राकृतिकता म्हणून काहीच अर्थ नाही. तिला जेव्हा मूल्यांचा स्पर्श होतो, तेव्हा ती अर्थपूर्ण बनते. तसेच मूल्यांना मूल्य म्हणून अर्थ नाही. ती माणसाच्या प्राकृतिक जीवनाला जेव्हा अर्थपूर्ण बनवतात, तेव्हाच मूल्य म्हणून अर्थ प्राप्त होतो. अशी अर्थपूर्णता लाभलेला माणूस हाच खरा माणूस.''[९] विचारशीलतेचा हा दृष्टिकोन मूल्यगर्भता स्पष्ट करणारा आहे.

## ४.५ *वैचारिक वाङ्.मयाची वैशिष्ट्ये*

१. शब्द व अर्थातून साहित्याची निर्मिती होते तर ज्या साहित्यात विचारशीलतेला प्राधान्य असते ते वैचारिक साहित्य ठरते.
२. स्वत:च्या भावभावनांच्या अभिव्यक्तीतून लेखक लिहितो, असे भावनेला प्राधान्य देते ते 'ललित साहित्य' तर आपल्या विचारातून इतरांचे परिवर्तन घडवते ते 'वैचारिक साहित्य' होय.
३. इतरांच्या मनात बदल घडविणे, आपले मत दुसऱ्याला पटविणे हा वैचारिक साहित्याचा हेतू असल्याने वैचारिक साहित्यात बुध्दीला अधिक आवाहन असते.
४. विज्ञान हे तांत्रिक प्रयोगनिष्ठ व सत्यशोधनाला महत्त्व देणारे असते म्हणून ते वैचारिक साहित्य ठरत नाही. तर वैचारिक साहित्य हे विकारासह विचारातून निर्माणहोते. विज्ञानात विकाराला स्थान असते. मानवी मनातील विविधता यामधून वैचारिक साहित्याची निर्मिती होते.
५. ललित साहित्यात मानवी विकारालाही स्थान असते. हे साहित्य संघर्षातून,कल्पनेतून, भावनेतून आकाराला येते. वैचारिक साहित्यात विकाराऐवजी अधिक प्राधान्य विचाराला असते.

६. मानवी गद्याचा इंग्रजी अवतार या दत्तो वामन पोतदार यांच्या पुस्तकात आधुनिक युगाच्या वैचारिक प्रारंभीचे विवेचन केलेले आहे. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, गो.ग.आगरकर यांचे वैचारिक साहित्य प्रारंभ काळात दिसते. ह्या वैचारिक लेखनाचे स्वरूप बरेचसे आवाहनात्मक होते.
७. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या वैचारिक साहित्यातून वैचारिक बदल झाले. ते राष्ट्रीय विचारसरणीचे होते. परंतु सामाजिक जाणीव मर्यादित असल्याने ही वैचारिक उच्च वर्णीयांपुरती मर्यादित राहिली.
८. गो.ग.आगरकर, महात्मा फुले इत्यादींनी प्रबोधनात्मक व सामाजिक सुधारणावादाला महत्त्व देऊन वैचारिक साहित्याची निर्मिती केली.
९. वैचारिक साहित्य म्हणजे आपल्या विचारधारेचे स्पष्टीकरण करीत इतरांना आपला विचार पटवून देणे व अनुकूल मतपरिवर्तन घडवून आणणारे लेखन होय.
१०. स्वातंत्र्यपूर्व काळात अधिक वैचारिक साहित्य निर्माण झाले तर नंतर मात्र फारशा प्रभावाने ते मराठीत निर्माण झाले नाही.

## ५.समारोप

वैचारिक वाड्.मयाची निर्मिती ही स्वातंत्र्यपूर्व असल्यामुळे अनेकांच्या विचारावर या निर्मितीचा प्रभाव आहे. त्या काळात निर्माण झालेले वैचारिक वाड्.मय वैचारिकदृष्टया समृध्द आहे आणि विचाराशील आहे. वैचारिक लेखन करणा-या लेखकांच्या विचारांना अनुभवसिध्दतेची आणि नैतिकतेची धार आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये प्रकटनाचे सामर्थ्य आहे. वेळप्रसंगी चुकीच्या गोष्टींवर आपले परखड मत व्यक्त करण्याचे धाडस त्यांच्या वैचारिक साहित्याने केलेले आहे. तेव्हापासून वैचारिक साहित्यातून सामाजिक, राजकीय, धार्मिक गोष्टींमध्ये वैचारिक बदल घडवून लोकांपर्यंत हे साहित्य पोहचा करण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृष्णराव भालेकर आदी लेखकांनी वैचारिक वाड्.मयामध्ये लेखन समाज जागृतीचे कार्य केलेले आहे.

## ७.संदर्भ टीपा

१.गंधारे द. के., 'वैचारिक साहित्याचे संशोधन : स्वरूप आणि दिशा', शब्दश्री प्रकाशन, पुणे, २६ ऑगस्ट २०१३,पृ. क्र. १५३
२.शेलार सुधाकर, 'वैचारिक साहित्याचे संशोधन : स्वरूप आणि दिशा', द. के. गंधारे, संशोधन : स्वरूप आणि व्याप्ती, शब्दश्री प्रकाशन, संपादक, प्रा. डॉ. भास्कर शेळके, २६ ऑगस्ट २०१३, पृ. क्र. १५५
३. गंधारे द. के., उनि., पृ. क्र. १५३
४. शेणोलीकर ह. श्री., 'मराठी संत-तत्त्वज्ञान संज्ञा-कोश', एस.एज. क्रिएशन, पुणे, ११ एप्रिल १९९४, पृ. क्र. ३९५
५. रेगे म. पु., 'मराठी विश्वकोश', खंड १६ वा, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९९९, पृ. क्र. ३०१
६. रेगे म. पु., उनि., पृ. क्र. ३१०
७. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री 'प्रबोधनपर वैचारिक वाड्.मय', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पुस्तक दुसरे, डॉ. सदानंद मोरे, जानेवारी २००३, प्रकाशक सुरेश कोवळे, पृ. क्र. ९५
८. ठकार निशिकांत, 'साहित्य : मूल्य आणि मूल्यांकन', सुविद्या प्रकाशन, पुणे,जानेवारी २००६, पृ. क्र. १
९. मंचरकर र. बा., 'ध्येयासक्त', अमेय प्रकाशन,पुणे, प्रकाशक उल्हास लाटकर, एप्रिल २००८, पृ. क्र. १